# महाराष्ट्र शासन
## इंदिरा गांधी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय,नागपुर

सेंट्रल एव्हेन्यू रोड, रेल्वे स्टेशन जवळ,नागपुर-४४००१८

कार्यालय दुरध्वीनी क्र.०७१२-२८२०२०० फॅक्स क्र०७१२-२७८०२८

ईमेल आय डी :- igmcn@rediffmail.com वेबसाईट :- igmc.org


जा.व.क्र. इंगांशावैम/आस्था १व२/सहा.प्राध्यापक/रिक्त पदे/जाहीरात/624-26 /२०२३, दिनांक08/०३/२०२३

## -: जाहिरात :-

**विषय:-** **सहायक प्राध्यापक, साथरोगतज्ञ-नि-अधिव्याख्याता, स्त्री वैद्यकीय अधिकरी-नि-अधिव्याख्याता(पीएसएम विभाग) व वैद्यकीय अधिकरी यांची रिक्तपदे कंत्राटी तत्वावर थेट मुलाखतीव्दारे १२० दिवसाकरीता भरण्याबाबत.**

**संदर्भ:-** **शासन निर्णय क्र.वेतनी २०१९/प्र.क्र.०३/२०१९/वैसेवा-२,दि.३१.१२.२०२०**

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेतेच्या आस्थापनेवर रिक्त असलेली पदे भरण्याकरीता खालील नमुद केलेल्या अचित्सिालयीन व चिकित्सालयीन विषयातील सहायक प्राध्यापक(गट-ब), साथरोगतज्ञ-नि-अधिव्याख्याता, स्त्री वैद्यकीय अधिकरी-नि- अधिव्याख्याता(पीएसएम विभाग) तसेच वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे कंत्राटी तत्वावर स्थानिक निवड मंडळामार्फत भरण्याकरीता पात्र उमेदवाराकडून खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत.

तरी इच्छुक उमेदवारांनी सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील अर्ज संपूर्ण शैक्षणिक तपशिलासह/आवश्यकत्या कागदपत्रे/प्रमाणपत्राच्या छायांकित प्रतीसह अधिष्ठाता यांचे कार्यालय, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नागपूर सी.ए.रोड नागपूर या पत्त्यावर सदरील जाहिरात प्रसिध्द झाल्यापासुन दिनांक १३/०३/२०२३ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत आस्थापना विभागास स्वहस्ते सादर करावे. तसेच वैद्यकीय अधिकारी पदाचे अर्ज रुग्णालयीन आस्थपनेवर स्वहस्ते सादर करावे.

तसेच सर्व उमेदवारांनी **दिनांक १५/०३/२०२३ रोजी मुळ प्रमाणपत्रसह सकाळी ११.३० वाजता अधिष्ठाता यांचे दालन, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे प्रत्यक्ष मुलाखतीकरीता (Walk-in-Interview) उपस्थित राहावे.** मुलाखतीस उपस्थित न राहिल्यास उमेदवाराचा कंत्राटी नियुक्तीकरीता विचार करण्यात येणार नाही.

**रिक्त पदाचा तपशिल खालील प्रमाणे:-**

| अ.क्र | पदाचे नाव | विषय | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| ०१ | सहायक प्राध्यापक (अचिकित्सालयीन) | शरीररचनाशास्त्र | ०१ | एम.डी.शरीररचनाशास्त्र |
| ०२ | | जीवरसायनशास्त्र | ०१ | एम.डी.जीवरसायनशास्त्र |
| ०३ | | सुक्ष्मजीवशास्त्र | ०१ | एम.डी.सुक्ष्मजीवशास्त्र |
| ०४ | | विकृतीशास्त्र(रक्तपेढी) | ०१ | एम.डी.विकृतीशास्त्र |
| ०५ | | न्यायवैद्यकशास्त्र | ०२ | एम.डी. न्यायावैद्यकशास्त्र |
| ०६ | साथरोगतज्ञ-नि-अधिव्याख्याता | जनऔषधवैद्यकशास्त्र | ०१ | एम.डी.जनऔषधवैद्यकशास्त्र |
| ०७ | स्त्री वैद्य.अधि.नि.अधिव्याख्याता | जनऔषधवैद्यकशास्त्र | ०१ | एम.डी.जनऔषधवैद्यकशास्त्र |
| ०८ | सहायक प्राध्यापक (चिकित्सालयीन) | शल्यचिकित्साशास्त्र | ०१ | एम.एस.शल्यचिकित्साशास्त्र |
| ०९ | | औषधवैद्यकशास्त्र | ०१ | एम.डी. औषधवैद्यकशास्त्र |
| १० | | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | ०१ | एम.डी त्वचा व गुप्तरोगशास्त्र |
| ११ | | बालरोगचिकित्साशास्त्र | ०१ | एम.डी.स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र |
| १२ | | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | ०१ | एम.डी. बधिरीकरणशास्त्र |
| १३ | | क्षयरोगशास्त्र | ०१ | एम.डी.क्षयरोगशास्त्र |
| १४ | | क्ष-किरणशास्त्र | ०१ | एम.डी. क्षकिरणशास्त्र |
| १५ | | दंतशास्त्र | ०१ | एम.डी.एस. दंतशास्त्र |
| १६ | वैद्यकीय अधिकारी | अपघात विभाग | ०५ | एमबीबीएस |

रिक्त जांगाच्या संख्येत बदल होण्याची शक्यता असल्यामुळे सदरील रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याचे अधिकार प्रशासनास राहतील. तसेच या जाहिरातीमधील कोणताही मजकुर उदा.अटी, शर्ती, नियम,पदसंख्या इत्यादी मध्ये कोणतेही बदल करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी राखून ठेवले आहे.

सर्व जाहीर केलेल्या रिक्त पदासाठी मुलाखती घेण्यात येत असुन, रिक्त पदाच्या उपलब्धते प्रमाणे प्रथम निवड झालेल्या पात्र उमेदवारांना नियुक्तीचे आदेश देण्यात येतील व तदनंतर रिक्तपद उपलब्ध झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांचा गुणवत्तेप्रमाणे विचार करण्यात येईल. उमेदवाराची कागदपत्रे परिपुर्ण नसल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही. जर उमेदवारास एका पदापेक्षा जास्त पदाकरीता अर्ज सादर करावयाचा असेल तर प्रत्येक पदासाठी वेगळा अर्ज सादर करावा.

**नियम व अटीः-**

१)वेतनश्रेणीः- सहायक प्राध्यापक, साथरोगतज्ञ-नि-अधिव्याख्याता व स्त्रीवैद्यकीय अधिकारी-नि-अधिव्याख्याता यांना दि. ३१.१२.२०२० च्या शासन निर्णयातील तदतूदीनुसार रु.१,००,०००/- (अक्षरी एक लाख रुपये केवळ) इतके ठोक मानधन दरमहा अनुज्ञेय राहिल. तसेच वैद्यकीय अधिकारी यांना दरमहा रु.७५०००/- ठोक मानधन अनुज्ञेय राहील. सदरील वेतन संस्थेत मंजुर असलेल्या मुळ अनुदानातून १० कंत्राटी सेवा या उद्दिष्टामधुन भागविण्यात येईल.

२)वयोमर्यादाः- सेवाप्रवेश नियमानुसार वयोमर्यादा खुल्या प्रवर्गाकरिता ३८ वर्ष व मागास प्रवर्गाकरिता ४३ वर्ष राहील. उमेदवार मागास प्रवर्गात असेल तर जात व जातवैधता प्रताणपत्र आवश्यक राहील.

**३)गुणवत्ताः-राष्ट्रीय वैद्यक आयोगाच्या मानकाचीची पुर्तता करण्याकरीता सहायक प्राध्यापक, साथरोगतज्ञ-नि-अधिव्याख्याता व स्त्रीवैद्यकीय अधिकारी-नि-अधिव्याख्याता या पदाकरीता वरिष्ठ निवासी पदाचा किमान १ वर्षाचा अनुभव असने आवश्यक राहिल.**

४)बंधपत्रित उमेदवारास प्रथम प्राध्यान्य देण्यात येईल. एमडी/एमएस किंवा एमबीबीएस अभ्यासक्रम या संस्थेतून पास केलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. उमेदवार जर या संस्थेतून पास झाला नसल्यास महाराष्ट्रातील इतर शासकीय संस्थेतून पास झाला असल्यास त्यास प्राधान्य देण्यात येईल. महाराष्ट्रातील इतर शासकीय संस्थेतून पास झालेला उमेदवार उपलब्ध नसल्यास खाजगी संस्थेतून किंवा इतर राज्यातून आलेल्या विद्यार्थ्यांना विभागाची निकड लक्षात घेता प्राध्यान्य देण्यात येईल. त्यानंतर मेरिट गुण पीजी आणि युजी नुसार प्राधान्य देण्यात येईल. तसेच शोधनिबंध, राज्य व आखिल भारतीय स्तरावरील परिषदेतील सहभाग याचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

६)निवड करण्यात आलेला उमेदवार कार्यरत असताना सतत जास्त कालावधी गैरहजर असल्यास किंवा काम समाधानकारक नसल्यास त्यांची कंत्राटी नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल.

७)सदर पदाकरीता उमेदवाराची नियुक्ती १२० दिवसाकरीता कंत्राटी स्वरुपाची राहिल. १२० दिवसानंतर रिक्त पद उपलब्ध असल्यास एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून पुन्हा १२० दिवसाकरीता विचार करण्यात येईल. सदरील नियुक्ती दरम्यान महाराष्ट्र लोकसेवा ओगामार्फत शासनाकडून नियमित अथवा बदलीने उमेदवार उपलब्ध झाल्यास कंत्राटी तत्वावरील तात्पुरती नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल.

८) मुलाखतीस उपस्थित राहण्याकरिता कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहणार नाही, तसेच मुलाखतीस उपस्थित राहण्याकरिता या कार्यालया मार्फत कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही. जर उमेदवार इतर संस्थेत कार्यरत असल्यास त्या संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहिल.

९)अर्जासोबत खालील प्रमाणपत्राच्या छायाप्रती साक्षांकित करुन जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही. नंतर कोणतेही कागदपत्रे स्विकारले जाणार नाही.

(अ)प्रथम, व्दितीय व तृतीय वर्ष एमबीबीएस तसेच एमडी/एमएस किंवा समतूल्य या सर्व परिक्षेची गुणपत्रिका व प्रयत्न प्रमाणपत्रे (ब)सर्व पदवी पदवीका व पदव्युत्तर पदवी परीक्षेची डिग्री प्रमाणपत्रे व अंतीम वर्षाची गुणपत्रिका (क) एम.एम.सी तसेच एम.सी.आय नुतणीकरण केलेले नोंदनी प्रमाणपत्र (ड) जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र(लागू असल्यास) (ई) जन्म दाखला/शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला (फ) एक वर्ष एस.आर. पदाचे अनुभव प्रमाणपत्र (ग) पॅनकार्ड व आधारकार्डची छायाप्रत इत्यादी कागदपत्रे/प्रमाणपत्राचा एक छायांकित संच अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

सदर जाहिरात या महाविद्यालयाच्या iggmc.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

अधिष्ठाता,<br>
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,<br>
नागपुर.

**प्रतिः-**

१) संबंधित सर्व प्राध्यापक व विभागप्रमुख, इंगांशावैम, नागपूर

२) सर्व अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महविद्यालये यांचे माहितीकरीता सविनय सादर.

३) नोटीसबोर्ड करीता, इंगांशावैम, नागपूर.

**प्रतिलीपीः- माहिती करीता सविनय सादर**

मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांचे माहितीस्तव सादर.